आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ जून २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सभापतीपदी भाजपाचे ओम बिरला सलग दुसऱ्यांदा विराजमान

- सभापतीपदासाठी उमेदवार दिल्याबद्दल भाजपाची काँग्रेसवर टीका

- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी मतदानाला प्रारंभ, ११ वाजेपर्यंत सरासरी २५ टक्क्याहून जास्त मतदान

- महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होणार

- राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या एकशेपन्नासाव्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमातून आदरांजली

- बदलत्या आव्हानांचा सामना करण्याच्या दृष्टीनं संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतल्या स्थायी आणि अस्थायी सदस्य संख्येत वाढ करण्याची भारताची मागणी

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत उद्या भारताची लढत गतविजेत्या इंग्लंड बरोबर रंगणार

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ खासदार ओम बिर्ला यांची आज लोकसभेच्या सभापतीपदी सलग दुसऱ्यांदा निवड झाली. निवड झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेता राहुल गांधी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बिर्ला यांचं अभिनंदन केलं आणि त्यांना आसनापर्यंत नेलं.

बिर्ला यांची दुसऱ्यांदा निवड होण्यानं इतिहास रचला गेल्याची प्रतिक्रिया मोदी यांनी व्यक्त केली. बिर्ला यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाची विधेयकं लोकसभेत मंजूर झाल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांच्या कार्यकाळात ९७ टक्के विधायक काम झाल्याचं मोदी म्हणाले. संसद सदस्यांची वर्तणूक आणि उत्तरदायित्व यामुळे जनतेचा संसदीय लोकशाहीवरचा विश्वास वाढतो, असं मत त्यांनी व्यक्त केलं. तत्पूर्वी आज लोकसभेचं कामकाज सुरू होताच मोदी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या इतर नेत्यांनी बिर्ला यांची सभापतीपदी निवड करण्यासाठीचा प्रस्ताव ठेवला होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि समाजवादी पक्षाचे आनंद भदौरिया यांनी काँग्रेसचे सभापतीपदासाठीचे उमेदवार कोदिकुन्निल सुरेश यांना अनुमोदन देणारा प्रस्ताव मांडला. पण विरोधी पक्ष मतदानाविषयी आग्रही न राहिल्यामुळे बिर्ला यांची आवाजी मतदानानं निवड करण्यात आली.

**<><><><><>**

लोकसभेच्या सभापतीपदासाठी काँग्रेसनं उमेदवार उभा केल्याबद्दल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज टीका केली. ते संसदेबाहेर वार्ताहरांशी बोलत होते. उपसभापतीपदासाठी सरकार चर्चेला तयार आहे मात्र त्यासाठी पूर्वअटी घालणं योग्य नाही असंही ते म्हणाले. लोकसभा सभापतीपदासाठी विरोधी पक्षांनी दबावाचं राजकारण केल्याची टीका केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंग यांनी केली. सरकारनं या मुद्द्यावर कोणतीही चर्चा केली नाही, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. बिर्ला यांची दुसऱ्यांदा लोकसभापती पदासाठी निवड केल्याबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनंतर लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ४ जागांसाठी आज मतदान होत आहे. **मुंबई आणि कोकण** पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांचा यात समावेश आहे. माजी राज्यपाल राम नाईक यांनी आज सकाळी मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी मतदानाचा हक्क बजावला. सकाळी ११ वाजेपर्यंत मुंबई पदवीधर मतदारसंघात २७ पूर्णांक १ शतांश टक्के, मुंबई शिक्षक मतदारसंघात १८ पूर्णांक ३१ शतांश टक्के, **कोकण** पदवीधर मतदारसंघात २० पूर्णांक १५ शतांश टक्के, तर **नाशिक** शिक्षक मतदारसंघात २३ पूर्णांक १६ शतांश टक्के मतदान झालं आहे. या निवडणुकीची मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे. या चारही विधानपरिषद मतदारसंघांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांचा कार्यकाळ येत्या ७ जुलै रोजी संपणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून म्हणजेच २७ जूनपासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन १२ जुलैपर्यंत चालेल. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मांडण्यात येईल. पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आज संध्याकाळी सह्याद्री अतिथीगृहात चहापानाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर राज्य मंत्रीमंडळाची बैठक होईल.

**<><><><><>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या एकशेपन्नासाव्या जयंती दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन इथं छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही शाहू महाराज यांना

समाजमाध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी शाहू महाराजांचे जन्मस्थळ असणाऱ्या लक्ष्मी विलास पॅलेस' इथल्या शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केल. ऐतिहासिक दसरा चौक येथे १९२७ साली बांधलेल्या शाहू महाराजांच्या पुतळ्याचं पूजन करुन पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केलं

शाहू महाराज यांचा जन्मदिवस ‘सामाजिक न्याय दिन’ म्हणून साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त कोल्हापूर मध्ये शोभा यात्रा आणि समता दिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

सध्याची जागतिक आव्हानं प्रभावीपणे पेलण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या स्थायी आणि अस्थायी सदस्य संख्येत वाढ करून सुरक्षा परिषदेत सुधारणा करायला हव्यात, अशी मागणी भारतानं केली आहे. पुढच्या वर्षी संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेला ८० वर्ष पूर्ण होत असून सुधारणांसाठी हीच योग्य वेळ असल्याचं भारताचे प्रतिनिधी प्रतीक माथुर यांनी सांगितलं. सुरक्षा परिषदेवरच्या वार्षिक अहवालावर आमसभेत झालेल्या चर्चदरम्यान त्यांनी भारताची भूमिका मांडली. सध्या १५ सदस्यांच्या सुरक्षा परिषदेत चीन, फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि अमेरिका हे पाच स्थायी सदस्य असून केवळ त्यांनाच व्हिटोचा अधिकार आहे तर १० देश दोन वर्षांसाठी अस्थायी सदस्य म्हणून निवडले जातात.

**<><><><><>**

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अंमली पदार्थांचे दुष्परिणाम आणि तस्करीबाबत जनजागृतीसाठी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २६ जून हा दिवस अमलीपदार्थ विरोधी दिन म्हणून घोषित केला आहे. "पुरावा स्पष्ट आहे: प्रतिबंधच आवश्यक आहे" ही यंदाच्या दिनाची संकल्पना आहे. अमली पदार्थ विरोधी विभागाने या

दिनाचं औचित्य साधून गेल्या १२ जून पासून नशामुक्त भारत पंधरवडा हा देशव्यापी उपक्रम राबवला आहे. काश्मीरमधे श्रीनगर इथं आज युवा पदयात्रा काढण्यात आली. मणिपूरमधे मोटारसायकल रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री बिरेन सिंग यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><><>**

भारत आर्थिक विकासाच्या संदर्भात महत्वपूर्ण संरचनात्मक बदलाच्या उंबरठ्यावर असून सातत्यपूर्ण पद्धतीने ८ टक्के वृद्धी दराच्या दिशेने वाटचाल करत आहे. असं रिजर्व बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी म्हटले आहे. मुंबईत काल बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या १८८ व्या वार्षिक सभेला संबोधित करताना ते बोलत होते. भारताची विकास गाथा ही बहु-क्षेत्रीय आहे आणि पुढेही राहील. यामध्ये वस्तू आणि सेवा कर अग्रस्थानी असलेल्या विविध संरचनात्मक सुधारणांचं महत्वाचं योगदान आहे असं ते म्हणाले. इतर अनेक देशांच्या तुलनेत भारतात जीएसटी खूप वेगाने स्थिरावल्याचं सांगून ते म्हणाले मासिक जीएसटी संकलन १ लाख ७ हजार कोटी रुपयांवर पोहोचले असून, व्यवसायातही सुलभता आली आहे असं दास् यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

नीट- युजी परीक्षा घोटाळा प्रकरणात चौकशीसाठी केंद्रीय तपास पथक बीडला पोहोचलं आहे. बीड जिल्ह्यातल्या माजलगाव तालुक्यातल्या काही शिक्षकांची या पथकानं चौकशी केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज सकाळी झालेल्या सामन्यात कृष्ण प्रसाद गरगा आणि साई प्रतीक के या भारतीय जोडीनं स्कॉट गिल्डिया आणि पॉल रेनॉल्डस या आयरीश जोडीचा पराभव केला. राऊंड ३२ च्या या सामन्यात भारतीय जोडीनं २१-१४, २१-१२ अशा सरळ गेममधे प्रतिस्पर्धी जोडीला नमवलं.

भारताच्या  कार्तिकेय गुलशन कुमारचं आव्हान मात्र काल रात्री संपुष्टात आलं. तो चायनीज ताईपेईच्या जे लिआओकडून १९-२०, १३-२१ असा पराभूत झाला. त्यामुळे तो उप उपांत्य पूर्व फेरीत पोहोचू शकला नाही.   पॅरीस ऑलिम्पिक्सला जेमतेम महिना राहिल्यामुळे पी व्ही सिंधू, एच  एस प्रणॉय, लक्ष्य सेन, सात्विकसाईराज रांकीरेड्डी, चिराग शेट्टी, अश्विनी पोनप्पा, तनिशा क्रॅस्टो हे भारताचे आघाडीचे खेळाडू या स्पर्धेत उतरलेले नाहीत.

<><><><><>

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. उपांत्य फेरीतला दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातला सामना उद्या सकाळी ६ वाजता त्रिनिदादमध्ये तारौबा इथं होणार आहे तर भारत आणि इंग्लंड यांच्यातला सामनाही उद्याच गयाना इथं रात्री ८ वाजता होणार आहे. अंतिम सामना शनिवारी बार्बाडोसच्या ब्रिजटाऊन इथं होईल.

//<><><><><>//